प्लास्टीक / थर्माकॉलपासून बनविण्यात येणाऱ्या उत्पादनावर बंदी संदर्भात गठीत केलेल्या शक्ती प्रदत्त समितीमध्ये सुधारणा करण्याबाबत.... 637

महाराष्ट्र शासन
पर्यावरण विभाग
शासन निर्णय क्र.प्लास्टिक २०१८/प्र.क्र.२४/तां.क.४
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई -३२
दिनांक :- १० एप्रिल, २०१८.

वाचा:- या विभागाचे समक्रमांकाचे शासन निर्णय दिनांक २२.०३.२०१८

प्रस्तावना:-

पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीकोनातून प्लास्टीक तसेच थर्माकॉलच्या वापराने निर्माण होणाऱ्या अविघटनशील कचऱ्यामुळे होणाऱ्या प्रदुषणावर नियंत्रण आणण्यासाठी प्लास्टीक तसेच थर्माकॉल उत्पादनावर बंदी आणण्याबाबत दिनांक १५.०३.२०१८ रोजी मंत्री मंडळाच्या बैठकीत प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यानुषंगाने निर्णय घेण्यासाठी शक्ती प्रदत्त समिती दिनांक २२.०३.२०१८ च्या शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आली होती.

सदरहू समितीच्या कार्यकक्षेची व्यापकता लक्षात घेता सदरहू समितीमध्ये नव्याने सदस्यांचा समावेशन करण्याबांबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

मंत्री मंडळाच्या झालेल्या बैठकीत प्लास्टीक व थर्माकॉल उत्पादनांवर बंदी आणण्यासंदर्भात प्रस्तावित प्रारुप नियमांमध्ये सुधारणा करुन अंतिम करणे व या नियमनांमध्ये भविष्यामध्ये आवश्यक ती सुधारणा करणे व अंमलबजावणीबाबत आढावा घेऊन वेळोवेळी निर्णय घेण्यासाठी मा.मंत्री (पर्यावरण) यांच्या अध्यक्षतेखाली शक्ती प्रदत्त समिती गठीत करण्याबाबत निर्णय घेण्यात आला होता. सदरहू समितीची व्यापक कार्यकक्षा लक्षात घेता पुढीलप्रमाणे समितीचे पुर्नगठन करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| १. मा.मंत्री (पर्यावरण) | - अध्यक्ष |
| २. मा.मंत्री (वित्त व नियोजन, वने) | - सदस्य |
| ३. मा.मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण, शालेय शिक्षण) | - सदस्य |
| ४. मा.मंत्री (उद्योग) | - सदस्य |
| ५. मा.मंत्री (कामगार) | - सदस्य |
| ६. मा.राज्यमंत्री (पर्यावरण) | - सदस्य |

NOTARY GOVT. OF INDIA PRAVIN G. SAWANT GREATER MUMBAI MAHARASHTRA Regd. No. 6808 EXPIRY DT. 6/8/2018



Scanned by CamScanner

638

७. अपर मुख्य सचिव (पर्यावरण) - सदस्य
८. मुख्य मंत्र्यांचे अपर मुख्य सचिव - सदस्य
९. प्रधान सचिव (विधी व न्याय) - सदस्य
१०. सचिव (लघु व मध्यम उद्योग) तथा विकास आयुक्त (उद्योग) - सदस्य
११. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ - सदस्य
१२. आयुक्त (विक्रीकर) - सदस्य
१३. संचालक (पर्यावरण) - सदस्य सचिव

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्यांचा संकेतांक

असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने सांक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(संजय संदानशिव)
अवर सचिव, पर्यावरण

प्रत:-

१. मा.मंत्री (पर्यावरण) यांचे खाजगी सचिव
२. मा.मंत्री (वित्त व नियोजन) यांचे खाजगी सचिव
३. मा.मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण, शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव
४. मा.मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव
५. मा.मंत्री (उद्योग) यांचे खाजगी सचिव
६. मा.राज्यमंत्री, (पर्यावरण) खाजगी सचिव
७. अपर मुख्य सचिव, (पर्यावरण), मंत्रालय, मुंबई
८. मा.मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
९. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. आयुक्त, विक्रीकर, मुंबई
११. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ
१२. सचिव (लघु व मध्यम उद्योग) तथा विकास आयुक्त उद्योग
१३. संचालक (पर्यावरण)

Scanned by CamScanner

633
33

प्लास्टीक / थर्माकॉलपासून बनविण्यात
येणाऱ्या उत्पादनावर बंदी संदर्भात जारी
करण्यात आलेल्या अधिसूचनेच्या अनुषंगाने
तांत्रिक समिती, अंमलबजावणी समिती व
न्यायालयीन प्रकरणामध्ये समन्वय
साधण्यासाठी समिती गठीत करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
पर्यावरण विभाग
शासन निर्णय क्र.प्लास्टिक २०१८/प्र.क्र.५६/तां.क.४
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई -३२
दिनांक :- २६ एप्रिल, २०१८.

वाचा:-

१) समक्रमांकाचा शासन निर्णय दिनांक २२.०३.२०१८
२) शासन समक्रमांकाची अधिसूचना दिनांक २३.०३.२०१८
३) समक्रमांकाचा शासन निर्णय दिनांक १०.०४.२०१८
४) शासन समक्रमांकाची अधिसूचना दिनांक ११.०४.२०१८

प्रस्तावना:-

पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीकोनातून प्लास्टीक तसेच थर्माकॉलच्या वापराने निर्माण होणाऱ्या अविघटनशील कचऱ्यामुळे होणाऱ्या प्रदुषणावर नियंत्रण आणण्यासाठी प्लास्टीक तसेच थर्माकॉल उत्पादनावर बंदी आणण्याबाबत दिनांक १५.०३.२०१८ रोजी मंत्री मंडळाच्या बैठकीत प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यानुषंगाने निर्णय घेण्यासाठी उपरोक्त संदर्भ क्र. १ अन्वये शक्ती प्रदत्त समिती दिनांक २२.०३.२०१८ च्या शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आली होती. शक्ती प्रदत्त समितीने घेतलेल्या निर्णयानुसार संदर्भ क्र.२ अन्वये प्लास्टिक तसेच थर्माकॉल उत्पादनांवर बंदीबाबत अधिसूचना जारी करण्यात आली. तसेच संदर्भ क्र.४ अन्वये सुधारित अधिसूचना निर्गमित करण्यात आली.

प्लास्टिक तसेच थर्माकॉल उत्पादनांवर बंदी बाबत अंमलबजावणी सुकर होण्यासाठी तसेच शक्ती प्रदत्त समितीला तांत्रिकदृष्ट्या मार्गदर्शन तसेच त्यानुषंगाने शिफारस करण्यासाठी विविध समित्या गठीत करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन होता.

Scanned by CamScanner

634

शासन निर्णय:-

अ) प्लास्टिक व थर्माकॉल पासून बनविण्यात येणाऱ्या वस्तूंच्या नियमनाम शासनास तांत्रिकदृष्टया मार्गदर्शन करण्यासाठी खालीलप्रमाणे तज्ञ सभि गठीत करण्यात येत आहे :-

समितीची रचना:-

| | | |
|---|---|---|
| १. | अपर मुख्य सचिव पर्यावरण | अध्यक्ष |
| २. | विभाग प्रमुख केमिकल इंजिनियरिंग युडिसीटी, मुंबई | सदस्य |
| ३. | विभाग प्रमुख केमिकल इंजिनियरिंग आयआयटी, मुंबई | सदस्य |
| ४. | पॉलीमर केमेस्ट्री विभाग, नॅशनल केमिकल लॅबोरेटरी, पुणे | सदस्य |
| ५. | संचालक, स्वच्छ भारत अभियान, महाराष्ट्र राज्य | सदस्य |
| ६. | ऑल इंडिया प्लास्टिक उत्पादक संघटनेचे दोन प्रतिनिधी | सदस्य |
| ७. | पेट बॉटल संघटनेचे दोन सदस्य | सदस्य |
| ८. | अशासकीय सेवाभावी संस्थाचे अध्यक्षांनी सुचविलेले दोन प्रतिनिधी | सदस्य |
| ९. | रिटेल विक्री संघटनेचे दोन प्रतिनिधी | सदस्य |
| १०. | महाराष्ट्र प्लास्टिक उत्पादन व वापर संघटनेचे दोन प्रतिनिधी | सदस्य |
| ११. | यूएनईपीचे प्रतिनिधी | सदस्य |
| १२. | सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ | सदस्य सचि |

समितीची कार्यकक्षा :-

सदरहू उपरोक्त समिती अध्यक्षांच्या मान्यतेने प्लास्टिक वा पेटबॉटल संबंधित इ प्रतिनीधींना तसेच इतर तज्ञ व्यक्ती / संस्था इत्यादींना बैठकीसाठी आवश्यकतेनुसार सद सचिव आमंत्रित करु शकतील. तज्ञ सदस्यांच्या प्रवास, बैठक भत्ता व अनुषंगिक ख महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाव्दारे करण्यात येईल. सदर समिती दरमहा कमीतकमी बैठक घेवून शासनास/ शक्ती प्रदत्त समितीस शिफारस सादर करेल.

ब) प्लास्टिक व थर्माकॉल उत्पादन बंदीबाबत नियमांच्या प्रभावी अंमलबजावणीस पुढीलप्रमाणे अंमलबजावणी समिती गठित करण्यात येत आहे :-

समितीची रचना:-

| | | |
|---|---|---|
| १ | सदस्य सचिव, म.प्र.नि.मंडळ | अध्यक्ष |
| २ | संचालक, नगरपालिका प्रशासन | सदस्य |
| ३ | सर्व विभागीय आयुक्तांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ४ | सर्व महानगरपालिका आयुक्त | सदस्य |
| ५ | अध्यक्षांच्या मान्यतेने आवश्यकतेनुसार आमंत्रित प्रतिनिधी | सदस्य |

NOTARY PRAVIN C. SAWANT GREATER MUMBAI MAHARASHTRA INDIA

C:\Users\surekha.kesarkar\Desktop\New Microsoft Word Document.docx

Scanned by CamScanner

३४

| | | |
|---|---|---|
| ६ | वरीष्ठ विधी अधिकारी, म.प्र.नि. मंडळ | सदस्य |
| ७ | सहायक सदस्य सचिव, तांत्रिक, म.प्र.नि.मंडळ | सदस्य सचिव |

635

समितीची कार्यकक्षा:-

१) सदरहू समिती या अधिसूचनेच्या अंमलबजावणीचा आढावा दर महिन्यात कमीतकमी एक बैठक घेवून शासनास/ शक्ती प्रदत्त समितीस शिफारस सादर करेल.

२) या अधिसूचनेचे प्रभावी अंमलबजावणीसाठी कार्यक्रम आखणे, प्रसिध्दीसाठी साहित्य तयार करणे, अधिसूचनेबाबत जनतेमध्ये जनजागृतीसाठी कार्यक्रम राबविणे, अधिसूचनेबाबत उपस्थित केल्या जाणाऱ्या शंकांचे निरसन करणे व त्याबाबत प्रश्नावली तयार करुन ती प्रसिध्द करणे.

३) अधिसूचने संबंधित न्यायालयीन प्रकरणामध्ये शासनास माहिती पुरविणे, शपथपत्राचा प्रारुप सादर करणे व न्यायालयाशी, हरित लवादाशी समन्वय साधणे इत्यादी.

४) अधिसूचनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी अंमलबजावणी प्राधिकरणांना मार्गदर्शन करणे, न्यायालयाच्या आदेशांची अंमलबजावणी करणे, प्रशिक्षण देणे व विधी सल्ला देणे इत्यादी.

सदर समिती प्रत्येक महिन्यात कमीत कमी एक बैठक घेईल व त्याचा अहवाल शासनास सादर करेल. याबाबत येणारा खर्च महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे करण्यात येईल.

**क) प्लास्टिक व थर्माकॉल उत्पादन बंदीबाबत प्रसिध्द अधिसूचनेसंबंधी न्यायालयीन प्रकरणांमध्ये समन्वय साधण्यासाठी व अंमलबजावणी समितीस सहाय्य करण्यासाठी पुढीलप्रमाणे समिती गठित करण्यात येत आहे:-**

समितीची रचना:-

| | | |
|---|---|---|
| १ | सहाय्यक सदस्य सचिव, तांत्रिक महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ | अध्यक्ष |
| २ | विधी अधिकारी, म.प्र.नि.मंडळ | सदस्य |
| ३ | अवर सचिव, पर्यावरण विभाग | सदस्य |
| ४ | उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ | सदस्य |
| ५ | अध्यक्ष यांनी सूचवलेले मंडळातली अधिकारी | सदस्य |
| ६ | प्रा. अधिकारी, घनकचरा, मुख्यालय, म.प्र.नि. मंडळ | सदस्य सचिव |

NOTARY GOVT. OF INDIA
PRAVIN G. SAWANT
GREATER MUMBAI (MAHARASHTRA)
Regd. No. 6606
EXPIRY Dt. 6/8/2018

समितीचे कार्यकक्षा:-

१) ही समिती अधिसूचनेसंबंधित न्यायालयीन प्रकरणांमध्ये व हरित लवादाकडे दाखल प्रकरणांमध्ये शासनास सहाय्य करणे



Scanned by CamScanner

636

२) तांत्रिक व विधी विषयक माहिती उपलब्ध करणे

३) शासनाने सादर करावयाचे शपथपत्राचा प्रारुप सादर करणे वा शपथ पत्र स करणे.

४) न्यायालयाशी याबाबत समन्वय साधणे

५) वकीलाची नेमणूक करणे इ.

सदर समितीकडून न्यायालयीन प्रकरणांमध्ये येणारा प्रवास खर्च, न्याया खर्च वा आस्थापनेवरील खर्च महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे क येईल.

या व्यतिरिक्त या नियमांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रत्येक महानगरपा आयुक्त, नगरपालिका मुख्याधिकारी, जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली त्यांनी त्यांच्या स्तरावर अंमलबजावणी समिती प्रत्येक महानगरपालि नगरपालिका स्तरावर गठीत करण्यात यावी. ही समिती प्रत्येक महि अंमलबजावणीचा आढावा घेऊन शासनास अहवाल सादर करेल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(संजय संदानशिव)
अवर सचिव, पर्यावरण

प्रति:-

१. मा.मंत्री (पर्यावरण) यांचे खाजगी सचिव
२. मा.मंत्री (वित्त व नियोजन) यांचे खाजगी सचिव
३. मा.मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण, शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव
४. मा.मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव
५. मा.मंत्री (उद्योग) यांचे खाजगी सचिव
६. मा.राज्यमंत्री, (पर्यावरण) खाजगी सचिव
७. अपर मुख्य सचिव, (पर्यावरण), मंत्रालय, मुंबई
८. मा.मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
९. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. आयुक्त, विक्रीकर, मुंबई

GOVT. OF INDIA

Scanned by CamScanner